# <u>मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी यांचे न्यायालयात.</u>

<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक</u> ११८७/२०२२ निशाण कमांक : — १ लगत

रेल्वे सुरक्षा बल, रत्नागिरी

विरुद्ध

अमन शरीफ खान वय — २० वर्षे,

रा. गॉव गढी, चंद्रमन पोष्ट, ब्यारा जि.आगरा, उत्तरप्रदेश

**<u>अपराध कलम : भारतीय रेल्वे कायदा कलम १४४(१) अन्वये</u>**

तुम्ही दिनांक ३०/०८/२०२२ रोजी अनधिकृतरित्या रत्नागिरी रेल्वे स्थानक परिसरात ट्रेन नं. ०२१९७ मध्ये वडापाव विकताना मिळून आलात आणि त्यामुळे तुम्ही भारतीय रेल्वे कायदा कलम १४४(१) चा अपराध केलेला आहे.

प्र.१. ला : तुम्हाला केसच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर : होय.
प्र.२ रा : तुम्हाला आता गुन्हा समजवून व वाचून दाखविला तो समजला काय ?
उत्तर : होय.
प्र.३ रा : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : होय.

.................
आरोपीची सही

दिनांक :— ०१/०९/२०२२

**प्रभारी मुख्य न्यायदंडाधिकारी**
**रत्नागिरी**

## आदेश

आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबूल केलेला आहे. त्याने प्रार्थना केली आहे की, तो गरीब असल्यामुळे कमीतकमी शिक्षा करण्यात यावी. सदरील आरोपीला पुर्वी कोणताही गुन्हा केल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केलेले नाही. आरोपीने सांगितले आहे की, हा त्याचा पहिला गुन्हा आहे. सदरील केसमधील कागदपत्र त्याने पूर्वी गुन्हा केलेला आहे असे सिध्द करीत नाही. तसेच गुन्हयाचे स्वरूप किरकोळ आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५२ नुसार व त्याने स्वेच्छेने दिलेल्या गुन्हा कबूली अनुसार भारतीय रेल्वे कायदा कलम १४४(१) अन्वये दोषी ठरवून त्याला रक्कम रुपये १,०००/— (रु. एक हजार मात्र) इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा करणेत येत आहे. दंड भरणेस कसूर केलेस एक महिना साध्या कैदेची शिक्षा ठोठावणेत येते.

**एकूण दंड रक्कम रुपये १,०००/— (रु. एक हजार मात्र)**

रत्नागिरी
दिनांक : — ०१/०९/२०२२

**प्रभारी मुख्य न्यायदंडाधिकारी**
**रत्नागिरी**

-:CERTIFICATE:-

Judgment/order in ( Order below Exh.1 in S.C.C. No.1187/2022)

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.S.Sane |
| Court Name | :- | The Court of Chief Judicial Magistrate, Ratnagiri |
| Date of decision | :- | 01/09/2022 |
| Judgment signed by PO. on | :- | 01/09/2022 |
| Judgment uploaded on | :- | 01/09/2022 |